## पशुप्रदर्शन –

लातुर जिल्हयातील सर्वतालुक्यामध्ये काही प्रस्तावीत ठिकाणी तालुकास्तरीय पशुप्रदर्शन ग्रामपंचायत समिती सेस, पंचायत समिती सेस व जिल्हा परीषद सेस च्या माध्यमामधुन आयोजन केले जाते. सदर पशुप्रदर्शनात तालुक्यातील देवणी,लालकंधारी जातीच्या नर व मादी गटातुन उत्कृष्टं पशुची निवड केली जाते.जिल्हयात लातुर व उदगीर येथे जिल्हास्तरीय पशुप्रदर्शन आयोजीत केले जाते त्या मध्ये जिल्हयातील जातीवंत पशुधनाचा सहभाग असतो.या पशुप्रदर्शनासाठी लातुर येथे सिदधेश्वर देवस्थान समितीचा मोलाचा सहभाग असतो व उदगीर येथील पशुप्रदर्शनात कुषी उत्पन्नं बाजार समिती व जयजवान जयकिसान साखर कारखाना याचा सहभाग असतो.